


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १४७ वा गुरूवार दि. १७ जुलै २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# राज्यात विविध ठिकाणी बोगस दिव्यांग शिक्षकांवर कारवाई, बुलढाणा अद्यापही मागे...

## बोगस दिव्यांग / अस्तिव्यंग प्रमाणपत्र देणारे बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालयातील रॅकेट व त्यांचा म्होरक्याची पोलखोल पुढील सत्रात...

**जनसंचलन/बुलढाणा**

बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त करून सरकारी नोकरीतील विविध प्रकारचे लाभ उपटणाऱ्या शिक्षकांवर कारवाया सुरू झाल्या आहेत. काही शिक्षकांना निलंबित देखील करण्यात आले आहे. परंतु धडधाकट असूनही बोगस दिव्यांग/अस्तिव्यंग प्रमाणपत्र मिळवत खऱ्या दिव्यांगांवर अन्याय करणाऱ्या शिक्षकांवर बुलढाण्यात कारवाई का होत नाही, हा एक भला मोठा प्रश्न अनेक जण उपस्थित करीत आहेत. बुलढाण्यात अशा प्रकारची कारवाई करण्यास अधिकाऱ्यांना कोणी रोखले आहे, असा सवाल अनेक दिव्यांग उपस्थित करीत आहेत. राज्यभरात बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त करून सरकारी नोकरीतील विविध प्रकारचे लाभ उपटण्याचे प्रकार गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या माध्यमातून एक प्रकारे गंभीर गुन्हा पिढी घडवण्याचे काम करणारे शिक्षक करीत आहेत. खरे तर शिक्षकांकडून अशाप्रकारच्या बनावटगिरीची अजिबात अपेक्षा नाही.असे शिक्षक विद्यार्थ्यांसमोर काय आदर्श ठेवत असतील, हा मोठाच प्रश्न आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन लाभ उपटणाऱ्यांची माहिती उघड झाल्यानंतर त्यासंदर्भात चौकशी, पडताळणी व कारवाया सुरू झाल्या आहेत. काही दिवसांपूर्वी मुंबई महानगरपालिकेतील काही शिक्षक व कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. जळगाव जिल्ह्यातही चौकशी करून कारवाई करण्यात येत आहे. नुकतेच सातारा जिल्ह्यात दिव्यांगत्वाच्या चाचणीत अपयशी ठरणाऱ्या २५ शिक्षकांना निलंबित करण्यात आले आहे. बुलढाण्यात गेल्या अनेक दिवसांपासून या घोटाळ्यासंदर्भात दिव्यांग संघटनांसह दैनिक जनसंचलन व सातू न्यूज सातत्याने आवाज उठवण्याचे काम करीत आहे. काही महिन्यांपूर्वी तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांनी सर्व दिव्यांग शिक्षकांची मुंबई येथे जाऊन पडताळणी करण्याचे दोन वेळा निर्देश दिले होते. मात्र, त्यांनी दिलेल्या आदेशांवर अद्यापही कोणतीच कारवाई झालेली नाही. कारवाई होऊ नये म्हणून बोगस दिव्यांग मोठ्या प्रमाणात जिल्हा परिषदेत लॉबिंग करीत आहेत. खात्रिलायक सूत्रांनुसार या विषयाला घेऊन मोठी अर्थपूर्ण उलाढाल जिल्ह्याच्या शिक्षण विभागात घडताना दिसून येत आहे. त्यामुळेच शिक्षणाधिकाऱ्यांच्या आदेशावर पुढील कारवाई करण्यासंदर्भात अधिकारी उदासीन असल्याचे दिसून येत आहे. घोटाळा समोर आल्यानंतरही त्यावर कारवाई न करून अधिकारी एक प्रकारे या भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्याचे काम करीत आहेत. राज्यातील विविध भागात मोठ्या प्रमाणात कारवाई होत असताना बुलढाणा जिल्हा मात्र याबाबतीत खूपच ढिम्म असल्याचे दिसत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांची अशी कोणती मजबुरी आहे की ते यासंदर्भात शासनाचे आदेश प्राप्त झाल्यानंतरही याबाबत उचित कारवाई करीत नाहीत, असा सवाल उपस्थित केला जात आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने मागेच आपल्या वृत्तमालिकेत सांगितले होते की, खात्रिलायक माहितीनुसार जिल्ह्यात ५५५ बोगस दिव्यांग शिक्षक असण्याची शक्यता आहे. मात्र, हा आकडा किती खरा आणि किती खोटा हे तर प्रत्यक्ष दिव्यांगांची पडताळणी झाल्यानंतरच स्पष्ट होईल. परंतु याबाबतीत अधिकाऱ्यांची उदासीनता या प्रकरणातील गुंतागुंत आणखी वाढवत आहे, तसेच एक प्रकारे बोगस प्रकारांना खतपाणी घालत असल्याचे दिसत आहे. या गंभीर प्रकाराची शासनाने दखल घेणे गरजेचे आहे. दरम्यान, राज्यात सुरू असलेल्या दिव्यांगांच्या पडताळणीत देखील अनेक प्रकारे भेदभाव होत असल्याचा आरोप काही दिव्यांग शिक्षक करीत आहेत. ही संपूर्ण पडताळणीची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शी असणे गरजेचे आहे. दिव्यांग शिक्षकांची योग्य ती आरोग्य तपासणी करून त्यासंदर्भात अहवाल प्रकाशित करणे



गरजेचे आहे. मात्र, काही ठिकाणी या पडताळणीमध्ये मोठ्या प्रमाणात गुप्तता बाळगली जात आहे. ही गुप्तता नेमकी कशासाठी? ही पडताळणी नक्कीच पारदर्शी होते आहे का? या पडताळणीचा अहवाल सार्वजनिक केला जाणार आहे का? असे अनेक सवाल उपस्थित आहेत. कारण या संपूर्ण पडताळणीच्या प्रक्रियेत आर्थिक उलाढाल झाली, तर त्यामध्ये काही खरेखुरे दिव्यांग, जे आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील आहेत, ते देखील अपात्र होण्याचा भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासन-प्रशासनाने या संपूर्ण प्रक्रियेत एक पारदर्शिता बाळगावी व खऱ्या दिव्यांगांना लाभ द्यावा, तसेच बोगस दिव्यांगांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी या निमित्ताने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज करीत आहे.

---

# चड्डी बनियान गँग वरून विधानसभेत घमासान!

## शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड व आमदार संजय शिरसाट यांचा निषेध!

**जनसंचलन/बुलडाणा**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विरोधी आमदारांनी आक्रमक पवित्रा घेत विधीमंडळाच्या पायऱ्यांवर अनोखे आंदोलन केले. विधिमंडळाच्या आवारात आमदारांनी बनियन घालत, कमरेला टॉवेल गुंडाळला आणि सरकारविरोधात घोषणाबाजी केली.विशेष म्हणजे बुलढाणा चे आमदार संजय गायकवाड यांना त्यांच्या वर्तृणीकी वरून टार्गेट करण्यात आले असून त्यांचा निषेध करण्यात आला.

महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. विरोधकांनी सत्ताधाऱ्यां विरोधात आक्रमक पवित्रा घेत अनोख्या पद्धतीने आंदोलन केले. महाविकास आघाडीमधील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), शिवसेना (ठाकरे) आणि काँग्रेसच्या आमदारांनी एकत्र येत अंगात बनियन घातले आणि कमरेला टॉवेल गुंडाळत सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली. शिवसेनेचे (शिंदे) आमदार संजय गायकवाड यांनी काही दिवसांपूर्वी आमदार निवासातील कँटिनमध्ये बनियन आणि टॉवेलवरच एका कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. त्यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. तसेच याचे पडसाद विधिमंडळातही उमटले. संजय गायकवाड यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विरोधकांनी लावून धरली. तसेच काही दिवसांपूर्वी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचाही एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. ज्यामध्ये ते आपल्या बेडरुममध्ये बनियनवर बसलेले दिसत होते. तसेच मंत्री भरत गोगवले यांच्याही घरातील टॉवेलवरील व्हिडीओ व्हायरल झाला होता. या तीनही घटनांचा संदर्भ घेत विरोधकांनी शिवसेना (शिंदे) गटाला घेरण्याचा प्रयत्न केला.




विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभेतील आमदार जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, सतेज पाटील, महेश सावंत यांनी या आंदोलनात सभाग घेतल्याचे दिसले.

# ...दुर्गवैभवावर वैश्विक मोहोर...

## संपादकीय लेख

छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीतून घडलेल्या दुर्गरूपी लेण्यांवर युनेस्कोची वैश्विक मोहोर उमटली असून भारतातील ङ्गयुनेस्कोफप्रमाणित जागतिक वारसास्थळांमध्ये आता या ४४ व्या मालिकेचा समावेश झाला आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. पॅरिसमध्ये निष्पक्ष छाननीतून झालेल्या या घोषणेचे भारतीय शिष्टमंडळाने ङ्गजय भवानी, जय शिवाजीफच्या निनादात स्वागत केले. हा क्षण विशेषतः महाराष्ट्राच्या जनतेसाठी अपूर्व आनंदाचा ठरला. केंद्र सरकारचे पुरातत्त्व खाते आणि महाराष्ट्र सरकार व सांस्कृतिक विभाग यांनी ङ्गमराठ्यांचे लष्करी स्थापत्यफ या संकल्पनेची मांडणी केली व त्यासाठी सर्व स्तरांवर पाठपुरावा केला, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. या संकल्पनेचे अद्वितीय वैश्विक मूल्य ङ्गयुनेस्कोफला पटवून देण्यासाठी विविध स्तरांवर नियोजन झाले व अनेक इतिहासतज्ज्ञ, दुर्गप्रेमी, स्थानिक यांसह गिर्यारोहण महासंघाने त्यासाठी परिश्रम घेतले. संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार...फअसे वर्णन रामचंद्रपंत अमात्यांनी आज्ञापत्रांत केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी रचलेल्या बुलंद, बेलाग आणि बळकट किल्ल्यांवर इतिहासाची सोनेरी पाने लिहिली गेली आहेत. इथले बुरूज, माच्या, बालेकिल्ले, जलाशय, गोमुखी रचनेचे प्रवेशद्वार, नगारखाने म्हणजे मराठा साम्राज्याच्या जाज्वल्य इतिहासाची, शौर्याची, सांस्कृतिक वैभवाची, कलादृष्टीची आणि जनस्नेहाची प्रतिबिंबे आहेत. अशा साडेतीनशेहून अधिक गड-किल्ल्यांमधून नेमके १२ किल्ले निवडणे, हेही आव्हानच होते. स्वराज्याची २६ वर्षे राजधानी राहिलेला राजगड, शिवराज्याभिषेकाचा साक्षीदार रायगड, राजांचे जन्मस्थान शिवनेरी, सर्वोच्च साल्हेर, बाजीप्रभूंच्या बलिदानाचे प्रतीक पन्हाळगड, अफजलखानाच्या वधाने पहाडी शौर्याचे चिन्ह ठरलेला प्रतापगड; तसेच परकीय आक्रमणांचा भविष्यातील धोका ओळखून बांधलेले खांदेरी, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग असे अरबी समुद्राने वेढलेले जलदुर्ग अशी सार्थ निवड या मालिकेसाठी करण्यात आली आहे. विजापूरच्या आदिलशाहीच्या ताब्यातून खेचून आणलेला तमिळनाडूत बांधलेला जिंजीचा किल्लाही त्यात समाविष्ट करण्याची कल्पकता या योजनेत दाखविण्यात आली आहे. महाराष्ट्रात गेली अनेक वर्षे गडकिल्लेप्रमींनी शिवरायांचा इतिहास मनांत आळवत भक्तिभावाने सह्याद्रीतील अनघड वाटांवरून वारी केली आहे. अनेक ठिकाणी स्वच्छता मोहिमा केल्या आहेत. काहींनी त्याला गालबोटही लावले. सरकारी स्तरावर काही अपवाद वगळता आजवर या दुर्गवैभवाचे संवर्धन करण्याविषयी अनास्थाच अधिक दिसली आहे. कित्येक गडकिल्ले महाराजांच्या पुण्याईवर तरले आहेत. शत्रूचा वेढा मावळ्यांनी सोडविला, परंतु अनधिकृत बांधकामांच्या विळख्यापासून या बुरुजांना वाचविणे स्वराज्यातील सरकारांनाही जमलेले नाही. खांदेरी किल्ला आजवर




जनसामान्यांच्या रहदारीपासून दूर राहिल्याने तो मानवी कचऱ्यापासून अस्पर्शित राहिला. परंतु एकदा वर्दळ सुरू झाल्यावर असे रमणीय किल्लेही प्लास्टिकच्या भस्मासुराच्या वेढ्यात अडकतात. सरकारी अनास्थेचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे रसाळगडाच्या संवर्धनकामात तेथील दीपमाळ सातवरून पाच थरांची करणे! असले प्रताप महाराजांच्या काळात झाले असते, तर त्यांसाठी कठोर शिक्षा मिळाली असती. दिल्ली, राजस्थानच्या भुईकोटांना आलेले महालाचे स्वरूप हे त्यांच्या भौगोलिक स्वरूपामुळे शक्य झाले. महाराष्ट्रातील डोंगरी किल्ले हे ऊन, वारा, पाऊस झेलतही इतकी वर्षे चांगले राहिले. परंतु आपण त्यांची योग्य व शास्त्रीय नजरेने देखभाल करू शकलो नाही. योजनांचा निधी आला की, केवळ रंगरंगोटी आणि काँक्रीटचे मार्ग यांवर उधळपट्टी करून या वारसावास्तूंचे अंगभूत वैभव आपण गमावून बसलो. किल्ले दत्तक योजनेला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. रायगड, राजगडाच्या पायथ्याशी किंवा जलदुर्गांच्या बंदरापाशी एखादा ध्वनि-प्रकाश शो आणि एखादे परिचय केंद्र उभारायला हवे होते. आजकाल योजनांद्वारे येणारा पैसा कुणा कंत्राटदाराची किंवा स्थानिक नेतेमंडळींची धन करण्यातच झिरपतो. युनेस्कोफच्या मानांकनातून हा प्रकार होऊ नये. जनतेने हा ठेवा पाहावा, त्यातून न्याय्य राज्यकारभाराची प्रेरणा घ्यावी, हे तर खरेच. त्यासाठी लोकांची वर्दळ वाढणार, हे गृहीत धरून प्रसाधन आदींच्या काही मूलभूत सोयीसुविधा गडाचे सौंदर्य बाधित न करता निर्माण करणे उचित ठरेल. कुणा नतद्रष्टांनी सुविधांची किंवा प्राचीन पाऊलखुणांची नासधूस केल्यास त्यावरही कठोर अंकुश आणावा लागेल. केवळ जल्लोष करून हे होणार नाही, तर या १२ दुर्गांचे संवर्धन हे इतर वारसास्थळांसाठी पथदर्शी ठरायला हवे. तरच या मोहोरा महाराजांना समर्पित करता येतील.

# वसंतराव नाईक महामंडळ; स्वयंरोजगाराच्या कर्ज योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

वसंतराव नाईक विमुक्त जाती आणि भटक्या जमाती विकास महामंडळातर्फे स्वयंरोजगारासाठी कर्ज योजना राबविण्यात येते. यासाठी इच्छुकांनी अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे. विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, तसेच पैलवान कै. मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ व राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ या दोन उपकंपनीमार्फत वडार व रामोशी समाजातील नागरिकांसाठी स्वयंरोजगाराच्या माध्यमातून कृषी संलग्न व्यवसाय, लघू उद्योग, वाहतूक क्षेत्रातील संबंधित व्यवसाय, तांत्रिक व्यवसाय, पारंपारीक व्यवसाय अथवा सेवा उद्योग सुरु करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँक आणि महामंडळामाध्यमातून वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना आणि गट कर्ज व्याज परतावा योजना सुरु आहे. वैयक्तिक कर्ज योजनेअंतर्गत जास्तीत जास्त १५ लाख रुपये तर गट कर्ज योजनेअंतर्गत ५० लाख रुपये पर्यंत कर्जाचा लाभ घेता येतो. लाभार्थ्याने बँकेत मुद्दल आणि व्याज भरणे आवश्यक असून, त्यानंतर महामंडळ १२ टक्के व्याज रकमेपर्यंतची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या खात्यात परतफ ेड करते. यासाठी ु.ींक्षपीं.ळप या संकेतस्थळावरून ऑनलाईन प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. याशिवाय बीज भांडवल कर्ज योजनेअंतर्गत ५ लाख पर्यंतचे कर्ज, तर थेट कर्ज योजनेअंतर्गत १ लाखांचे बिनव्याजी कर्ज महामंडळाच्या कार्यालयात थेट अर्ज करून मिळू शकते. जास्तीत जास्त इच्छुक व्यक्ती व संस्थांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती



विकास महामंडळ (मर्या.), बुलढाणा यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती आणि भटक्या जमाती विकास महामंडळ(मर्या), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बुलढाणा येथे किंवा दुरध्वनी क्रमांक ०७२६२-२९५३१९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात होणार फेरबदल !

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**




राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात सध्या अनेक नव्या चेहऱ्यांचा प्रवेश होत असून, पक्षाचे बळ वाढताना दिसत आहे. पक्षाच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात लवकरच संघटनात्मक फ ेरबदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यासंदर्भात पालकमंत्री मकरंद पाटील यांनी जिल्हाध्यक्ष ॲड. नाझेर काझी यांना आवश्यक सूचना दिल्या आहेत. जिल्ह्यातील एकमेव सिंदखेडराजा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने आपली जागा राखण्यात यश मिळविले आहे. यापूर्वी येथे एकत्रित राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉ. राजेंद्र शिंगणे विजयी होत होते; मात्र, यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मनोज कायंदे यांनी त्यांचा पराभव करत विजय मिळवला. या विजयामुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. याशिवाय, माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांच्या पक्षप्रवेशामुळे खामगाव व शेगाव भागात पक्षाला नवसंजीवनी मिळाल्याचे पक्षात मानले जात आहे

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# हे कसलं प्रेम? पाच वर्षांच्या लेकीची बॉडी सडतेय, आई बॉयफ्रेंडसोबत पार्टीत गुंग; चिड आणणारी घटना...

**लखनऊ:** विवाहबाह्य संबंधातून अनेकदा अशा भयंकर घटना समोर येतात की त्या वाचून अंगाचा थरकाप उडतो. अशीच एक धक्कादायक घटना उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊमध्ये घडली आहे. येथे प्रियकराच्या प्रेमात आंधळी झालेल्या एका आईने आपल्या पोटच्या मुलीची निर्घृण हत्या केली. या घटनेने संपूर्ण लखनऊ हादरले आहे. आरोपी महिला रोशनी खानने तिचा प्रियकर उदित जयस्वालसह मिळून आपल्या पाच वर्षांच्या मुलीचा गळा दाबून खून केला. त्यानंतर तिने तिच्या पतीला यात फसवलं. ही महिला प्रेमात इतकी वेडी झाली होती की तिने लेकीची हत्या केल्यानंतर प्रियकरासोबत हॉटेलमध्ये पार्टी केली. लखनऊ पोलिसांनी ३६ तास या प्रकरणाचा तपास केला. जेव्हा पोलिसांनी संशयावरुन रोशनीला ताब्यात घेतलं आणि तिची चौकशी केली



तेव्हा तिने अखेर सत्य कबूल केले. रोशनीसाठी तिची पाच वर्षांची मुलगी ही प्रियकरासोबतच्या नात्यात अडथळा बनत होती. ही त्यांचं नातं उघड करेल असा संशय त्यांना होता. म्हणून त्यांनी मार्गातून तिचा काटा काढण्याचा कट रचला. रोशनी खानने तिचा प्रियकर उदित जयस्वालसह मुलीला मारहाण केली आणि नंतर तिचा गळा दाबून खून केला. हत्येनंतर तिचा मृतदेह एका बॅगेत ठेवला. ही घटना १३ जुलैच्या रात्री घडली. हत्येनंतर रोशनी आणि उदित घराला कुलूप लावून लखनऊमधील एका हॉटेलमध्ये गेले. तिथे दोघांनीही रात्रभर दारू पिऊन पार्टी केली.मुलगी सतत वडील शाहरुखसोबत राहण्याचा आग्रह धरत असे. म्हणून रोशनीने उदितसह तिची हत्या केली. रोशनीने पोलिस नियंत्रण कक्षाला फोन करून सांगितले की तिच्या मुलीची हत्या तिच्या पतीने केली आहे. परंतु पोलिस तपासात हे खोटे असल्याचे आढळून आले.प्रेमात वेडी झालेली रोशनी तिच्या मुलीच्या मृतदेहावर पाय देऊन चढली. त्यानंतर तिने तिचा मृतदेह बेड बॉक्समध्ये ठेवला आणि कुलूप लावले. जेव्हा मृतदेहातून दुर्गंध येऊ लागला तेव्हा मृतदेह बाहेर काढून एसीसमोर ठेवण्यात आला. जेव्हा तिला वाटले की घरी राहणे योग्य नाही, तेव्हा ती घराला कुलूप लावून उदितसोबत लखनऊमधील एका हॉटेलमध्ये गेली.याप्रकरणी माहिती देताना डीसीपी वेस्ट विश्वजीत श्रीवास्तव यांनी सांगितलं की, रोशनी आणि तिचा लिव्ह-इन पार्टनर शाहरुखच्या घरी राहत होते. मुलीच्या आईच्या तक्रारीवरून मुलीच्या वडिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान, रोशनी आणि तिच्या लिव्ह-इन पार्टनरच्या जबाबात विरोधाभास दिसून आला. मुलगी रोशनी आणि उदितसोबत राहू इच्छित नव्हती. मुलगी तिच्या वडिलांसोबत राहू इच्छित होती. दुसरीकडे, रोशनी शाहरुखला अडकवून त्याचे घर बळकावू इच्छित होती. त्यामुळे हा सारा कट रचण्यात आला.रोशनीचा तिच्या सासरच्यांशी आधीच वाद होता. तिने आधीच तिच्या सासरच्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. रोशनीने १३ जुलै रोजी मुलीला मारण्याचा आणि तिचा पती शाहरुखला अडकवण्याचा कट रचला. मुलीला मारण्यापूर्वी तिला मारहाण करण्यात आली. रोशनीने मुलीच्या पोटावर लाथ मारली आणि उदितने मुलीचे तोंड दाबलं, ज्यामुळे तिचा मृत्यू झाला. यानंतर, दोघेही सकाळी लवकर उठले, घराला कुलूप लावले आणि लखनऊमध्ये फिरले. एक-दोन ठिकाणी दारूही प्यायले. यानंतर, दोघेही एका हॉटेलमध्ये राहिले. मग, रोशनीने एक बनावट कहाणी रचली आणि सगळा दोष शाहरुखवर टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, तिचा हा प्रयत्न यशस्वी होऊ शकला नाही.

# नागपुरात मराठीवरून वाद; एफआयआरच्या हिंदी अनुवादावरून युनियन बँकेला मनसेचा दणका, दिलगिरी व्यक्त

**नागपूर :** राज्यात मराठी भाषा आणि तिच्या वापरावरून सुरू असलेल्या वादात आता नागपूर शहराचाही समावेश झाला आहे. नागपूरमधील यूनियन बँक ऑफ इंडिया शाखेत मंगळवारी मराठीच्या मुद्द्यावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या ( मनसे ) कार्यकर्त्यांनी दणका दिला. कामकाज ठप्प केलं. पोलिसांनी मनसे कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले, अखेर या प्रकरणी बँकेने दिलगिरी व्यक्त केली. या घटनेमुळे नागपूरसह राज्यभर मराठी भाषेच्या अधिकारांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.ही घटना नागपूरच्या बेलतरोडी परिसरातील एका दुर्दैवी रस्ते अपघाताशी संबंधित आहे. योगेश बोपचे (वय ३५) या तरुणाचा ८ जून रोजी पहाटे अपघाती मृत्यू झाला. योगेशचे कोणतेही वैयक्तिक जीवनविमा पॉलिसी नसल्याने त्याच्या पत्नी आणि दोन लहान मुलांवर मोठे संकट कोसळले. मात्र, एका कौटुंबिक मित्राच्या माहितीवरून योगेशच्या कुटुंबीयांना कळले की, बँक खातेदार म्हणून अपघात मृत्यूवर दोन लाख रुपयांची विमा भरपाई मिळू शकते.योगेशचा धाकटा भाऊ लोकेश बोपचे याने यूनियन बँकेत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करण्याचा प्रयत्न केला. मात्र, बँकेच्या अधिकाऱ्यांनी बोपचे कुटुंबीयांना सांगितले की, पोलिसांनी दाखल केलेला एफआयआर हिंदी किंवा इंग्रजी भाषेत अनुवादित करून नोटराईज करावा लागेल, तेव्हाच क्लेम प्रक्रिया पुढे नेली जाईल. नागपूरच्या बेलतरोडी पोलिस स्टेशनचा एफआयआर मराठीत असल्याने बँक अधिकारी अर्ज स्वीकारायला तयार नव्हते.या अटीमुळे बोपचे कुटुंबीयांनी मनसेकडे धाव घेतली. बुधवारी मनसेचे अनेक कार्यकर्ते बोपचे कुटुंबासह यूनियन बँकेत पोहोचले. ङ्गमराठी हीच राज्याची भाषा आहे, मग एफआयआरचा हिंदी अनुवाद का?फ अशा घोषणा देत मनसेने बँकेतील कामकाज ठप्प केलं. बँकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण दिलं की, विमा कंपनीचे मुख्यालय कोलकातामध्ये असून,



तिथले अधिकारी मराठी समजत नाहीत. क्लेम प्रक्रियेसाठी हिंदी अनुवाद आवश्यक आहे. मात्र, हे उत्तर नाकारत मनसेने आंदोलन अधिक तीव्र केलं. अखेर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतलं. यानंतर यूनियन बँकेने बोपचे कुटुंबीयांकडे आणि मनसेकडे दिलगिरी व्यक्त करत, क्लेम प्रक्रियेला गती देण्याचं आश्वासन दिलं. या प्रकरणामुळे केवळ बोपचे कुटुंबाच्या दुःखावर डोंगर कोसळला होता त्यात बँकेच्या धोरणाने अन्यायही सहन करावा लागला. भाषेच्या कारणाने गोरगरीब कुटुंबाची अडवणूक ही संतापजनक बाब आहे. अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!



# घनश्याम दरवडेला आहे लिव्हर, फुफ्फुस आणि किडनीचा त्रास; म्हणाला, सातवीत असताना मला...

**मुंबई -** घनःश्याम दरवडे हा बिग बॉस मराठीच्या पाचव्या पर्वातून चर्चेत आला. त्याला छोटा पुढारी असंही म्हणतात. बिग बॉसच्या घरात घनःश्यामने चांगलाच धुमाकूळ घातलेला. घनःश्यामला अनेकदा त्याच्या उंचीमुळे ट्रोल केलं जातं. त्याबद्दल त्यानं अनेक मुलाखतींमध्ये भाष्य केलं आहे. अशातच आता एका मुलाखतीदरम्यान घनःश्यामने त्याला लहानपणापासून आजर्पण असल्याचं सांगितलं. लोकमत फिल्मीला दिलेल्या मुलाखतीदरम्यान घनःश्यामने त्याला लहानपणापासून किडनी, लिव्हर आणि फुफ्फुसांचा आजार असल्याचं सांगितलं. हे सांगताना घनःश्याम भावुक झाला.



मुलाखतीदरम्यान घनःश्याम म्हणाला की, माझं बालपण हॉस्पिटलमध्येच गेलं आहे. त्यामुळे माझं बालपण आणि तरुणपण आता सुरू आहे. मी सहा वर्षांचा होईपर्यंत हॉस्पिटलमध्येच होतो. कारण, मला जन्मतःच काही त्रास होता. मला लिव्हर आणि किडनीचा त्रास होता, अजूनही आहे. माझी उंची कमी असल्यामुळे गावी मला डावललं जायचं, पण त्यावर मात करीत मी पुढे आलो.मला लोकांनी स्वीकारलं नसलं तरी माझ्या आई-वडिलांनी माझा स्वीकार केला. त्यामुळे मी आता जे काही आहे, ते त्यांच्यामुळेच आहे. सातवीत असताना मला माझ्या आजारपणाबद्दल कळलं. माझ्या वयाच्या सगळ्यांची उंची वाढत होती. त्यामुळे मी माझ्या आई-वडिलांना याबद्दल वारंवार विचारायचो, पण माझे आई-वडील मला तेव्हा काहीही सांगत नव्हते. माझी सहनशक्ती संपली. त्यामुळे मी थेट डॉक्टरांनाच याबद्दल विचारलं. कारण- एकीकडे मला समाजाचा त्रास होता आणि त्यात घरचेही काही सांगत नव्हते. त्यामुळे मी थेट डॉक्टरांना विचारलं, तेव्हा त्यांनी मला सांगितलं की, मला आनुवंशिकतेचा त्रास आहे. तेव्हाच मला थायरॉईडचा त्रास होता. लिव्हर आणि फुफ्फुसांना सूज आहे. मी आजही इंजेक्शन घेतो. कारण, माझं रक्त आपोआप तयार होत नाही. रक्त शुद्ध करण्यासाठी मला इंजेक्शन घ्यावं लागतं. त्यात मला क्रिएटीन आहे, त्यामुळे माझ्या किडनीलाही त्रास आहे. असं घनःश्यामने पुढे सांगितलं.दरम्यान, घनः श्याम दरवडे सध्या स्टार प्रवाह वाहिनीवरील शिट्टी वाजली रे या कार्यक्रमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत.

# सलमान खानवर आली बांद्र्यातला अलिशान फ्लॅट विकायची वेळ, इतक्या कोटींना झाली डील..



**मुंबई:** गेल्या काही वर्षात बॉलिवूड सेलिब्रिटींनी रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक केल्याचं पाहायला मिळालं. तर अनेक सेलिब्रिटींनी त्यांची मुंबईतली मालमत्ता विकल्याचंही समोर आलंय. आता सलमान खान देखील याच कारणामुळं चर्चेत आलाय. बॉलिवूड अभिनेता सलमान खान नेहमीच त्याच्या व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्यामुळं चर्चेत असतो. त्यानं नुकताच मुंबईतील त्याचा एक फ्लॅट ५.३५ कोटी रुपयांना विकला आहे. हा व्यवहार जुलै २०२५ मध्ये झाला असून, त्याचे तपशील महाराष्ट्र सरकारच्या नोंदणी कागदपत्रांवर () आणि स्केअर याड्र्स या रिअल इस्टेट प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत.सलमान खान बांद्रा येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये राहतो.मनी कंट्रोलच्या रिपोर्टनुसार, सलमान खाननें मुंबईतील एक निवासी मालमत्ता ५.३५ कोटी रुपयांना विकली आहे. वांद्रे पश्चिम इथल्या शिव स्थान हाइट्स या निवासी संकुलातील फ्लॅट त्यानं विकला आहे. हा फ्लॅट १३१८ स्केअर फूटचा असून त्याला तीन पार्किंग स्पेस आहेत. नोंदणीच्या तपशिलानुसार, या विक्रीमध्ये ३२.०१ लाख रुपयांची स्टॅम्प ड्यूटी आणि ३०,००० रुपयांची नोंदणी फी समाविष्ट आहे.सलमान खान त्याचे फोटो नेहमी सोशल मीडियावर शेअर करत असतो.त्याच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास, तो शेवटचा सिकंदर चित्रपटात दिसला होता. हा चित्रपट ईदच्या मुहूर्तावर प्रदर्शित झाला होता.सिकंदर चित्रपटात रश्मिका मंदान्ना मुख्य भूमिकेत होती.आता तो त्याच्या आगामी चित्रपटावर काम करत आहे. या चित्रपटात गलवान खोऱ्यातील संघर्षाची कथा दाखवण्यात येणार आहे.सलमान खान या भूमिकेसाठी खूप मेहनत घेत आहे .सलमान खानचे चाहते त्याच्या आगामी चित्रपटाची आतुरतेनं वाट पाहत आहेत.

# विशालचं सिनेस्टाईल अपहरण, फार्म हाऊसवर नेलं आणि..., नागपूर पोलिसांनी सापळा रचला, बालूचा टप्प्यात कार्यक्रम...

**नागपूर :** पैशांच्या वादातून सावकाराने साथीदारांच्या मदतीने प्रॉपर्टी डिलरचे अपहरण करून त्याला मारहाण केली. पोलिसांनी वेळीच शोध घेऊन प्रॉपर्टी डिलरची सुटका केल्याने अनर्थ टळला. याप्रकरणी हुडकेश्वर पोलिसांनी सावकरासह चौघांना अटक केली आहे. प्रवीण ऊर्फ बालू भाऊराव बुरकेवार, नीलेश अमृतराव नगरकर, नीलेश ज्ञानेश्वरराव तेलखंडे आणि राकेश हरीभाऊ अवचट अशी अटकेतील अपहरणकर्त्यांची नावे आहेत. विशाल शंकरराव उरकुडे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन ही कारवाई करण्यात आली. विशाल यांना पत्नीच्या नोकरीसाठी आणि पुतण्याच्या शस्त्रक्रियेसाठी पैशाची गजर होती. विशाल उरकुडे यांनी २०२२ मध्ये सावकार बालू याच्याकडून ३० लाख रुपये घेतले. याबदल्यात त्यांनी बहादुरामधील प्लॉट आणि नरसाळा परिसरातील चार दुकाने गहाण ठेवली. ते बालू याला महिन्याला ५६ हजार रुपये द्यायला लागले. त्यांनी एकूण १३ लाख ४४ हजार रूपये बालूला दिले. दरम्यान विशाल यांची आर्थिक परिस्थिती खालावली. त्यामुळे बालूला पैसे देण्यास ते असमर्थ झाले. त्यामुळे बालू संतापला. संपत्ती आपल्या नावावर करण्यासाठी बालू हा विशाल यांना धमकवायला लागला.




त्याने विशाल यांच्या दुकानांवर ताबाही घेतला.बालू आणि त्याच्या साथीदारांनी मंगळवारी सकाळी विशाल यांचे अपहरण केले. त्यांना क्रमांकाच्या कारमध्ये डांबले. त्यांना मारहाण करायला सुरूवात केली. आरोपींनी विशाल यांना उमरेड मार्गावरील उंबरगांव येथील फार्म हाऊसमध्ये डांबले. तेथेही त्यांना काठीने मारहाण केली. दरम्यान, विशाल यांचे अपहरण झाल्याची माहिती नातेवाईकांना मिळाली. नातेवाइकांनी हुडकेश्वर पोलीस ठाणे गाठून वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर भेदोडकर यांना माहिती दिली. भेदोडकर यांनी विशाल यांच्या मोबाइलवर संपर्क साधला. तो बंद होता. नातेवाईकांनी बालूबाबत माहिती देत त्याचा मोबाइल क्रमांक पोलिसांना दिला. पोलिसांनी बालूचे लोकेशन काढले. तो दिघोरी पुलाजवळ असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी सापळा रचून विशाल यांची सुटका केली. पोलिसांनी बालूसह चौघांना अटक केली. पोलिसांनी चौघांना बुधवारी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांची १८ जुलैपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली.

# नागपुरात जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या कैद्याने आयुष्य संपवलं, अंतरवस्त्राच्या इलास्टिकने घेतला स्वतःचा जीव...

**नागपूर:** नागपूर सेंट्रल जेल पुन्हा एकदा कैद्यांच्या सुरक्षेवर आणि मानसिक आरोग्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या घटनेमुळे चर्चेत आलं आहे. हत्या प्रकरणात आजीवन कारावासाची शिक्षा भोगत असलेल्या कैद्याने कारागृहाच्या आवारातच गळफास घेऊन आपल्या आयुष्याची अखेर केली. या घटनेमुळे तुरुंग प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर गंभीर स्वरूपाचे प्रश्न निर्माण झाले आहेत.धंतोली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत कैद्याचं नाव तुलसीराम शेंडे (वय ५४) असे असून तो गोंदिया जिल्ह्यातील रहिवासी होता. भंडाऱ्यात एका हत्या प्रकरणात दोषी आढळल्याने ३० जून २०२४ रोजी त्याला आजीवन कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यानंतर त्याची रवानगी नागपूर सेंट्रल जेलमध्ये करण्यात आली होती.तुलसीराम शेंडे हा मध्यवर्ती कारागृहातील ङ्गछोटी गोल बैरकफ परिसरात असलेल्या ङ्गरंग काम विभागफजवळील गोदामाजवळ एका खिडकीला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. पोलीस तपासानुसार, त्याने आपल्या अंडरवेअरच्या इलास्टिकचा वापर फास तयार करण्यासाठी केला होता. कारागृहाच्या कर्मचाऱ्यांच्या लक्षात येताच ही बाब धंतोली पोलिसांना कळविण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी पाठवला. प्राथमिक तपासानंतर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलीस आता हे शोधत आहेत की, नेमक्या कोणत्या मानसिक, सामाजिक अथवा वैयक्तिक कारणांमुळे तुलसीराम शेंडेने असा टोकाचा निर्णय घेतला. ही घटना अशा काळात घडली आहे, जेव्हा देशभरातील तुरुंग व्यवस्थेत कैद्यांच्या मानसिक आरोग्याच्या प्रश्नांवर, त्यांच्यावर होणाऱ्या ताणतणावावर आणि आत्महत्यांच्या वाढत्या घटनांवर सातत्याने चर्चा सुरू आहे. विशेषतः नागपूर सेंट्रल जेलमध्ये काही महिन्यांपूर्वीही आत्महत्येच्या घटना घडल्या होत्या. त्यामुळे जेल प्रशासनावर कैद्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अधिक दक्षता बाळगण्याचा दबाव वाढला आहे. कैद्यांचे मानसिक आरोग्य आणि त्यासाठी आवश्यक असलेली




समुपदेशनाची (काउन्सेलिंग) सुविधा प्रभावीपणे राबवण्यावर आता पुन्हा एकदा चर्चा रंगू लागली आहे. तुरुंगातील कडक शिस्त, अस्वस्थता, कुटुंबापासून दुरावा, आणि शिक्षेच्या भीतीमुळे कैद्यांच्या मानसिक स्थितीवर मोठा ताण येत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. तुलसीराम शेंडेच्या आत्महत्येने पुन्हा एकदा या व्यवस्थेतील त्रुटींवर प्रकाश टाकला असून, कारागृह प्रशासनाने तत्काळ सुधारात्मक उपाययोजना राबवण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# हो, तू माझा मुलगा आहेस, आता मला कुणीही अडवू शकत नाही... अमिताभ यांची अभिषेकसाठी खास पोस्ट

**मुंबई:** बॉलिवूड अभिनेता अभिषेक बच्चन याच्यासाठी हे वर्ष खास ठरलंय. या वर्षीत त्याचे तीन सिनेमे प्रदर्शित झाले. वेगवेगळ्या धाटणीचे हे सिनेमे प्रेक्षकांना चांगलेच आवडले. त्याच्या अभिनयाचंही प्रचंड कौतुक होतंय. अभिषेकचा कालीधर लापता हा सिनेमा नुकताच प्रदर्शित झाला. हा सिनेमा प्रदर्शित झाल्यानंतर सोशल मीडियावर नेटकऱ्यांनी अभिषेकचं प्रचंड कौतुक केलंय. नेटकऱ्यांच्या कौतुकानंतर आता अभिषेकचे वडील अर्थात महानायक अमिताभ बच्चन यांनीही लेकाचं कौतुक केलंय. अमिताभ यांनी भलीमोठी पोस्ट शेअर करत अभिषेकच्या कामाबद्दल लिहिलं, त्याचं कौतुक केलं आहे.अमिताभ बच्चन नेहमीच सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत आपल्या भावना व्यक्त करत असतात. ते नेहमीच अभिषेकच्या कामाबद्दलही बोलतात. आता त्यांनी शेअर केलेली खास पोस्ट चर्चेत आली आहे.एका वर्षात



तीन सिनेमे केले आणि ते तीनही वेगवेगळ्या धाटणीचे. आय वॉन्ट टू टॉक, हाउसफुल ५ आणि कालीधर लापता. तीनही सिनेमातल्या भूमिका अगदी वेगळ्या. वाटलंच नाही की या भमिका अभिषेक बच्चन साकारतोय. प्रत्येक सिनेमात हेच वाटलं की, तो एक पात्र आहे.असं, आजच्या युगात बघणं, वेगळी गोष्ट आहे, त्याला स्वीकारणं, आणि सक्षमतेनं निभावणं, हे गुण माझ्यात आहेत, हे अभिषेक तू जगाला दाखवून दिलंस ! मनापासून तुला आशीर्वाद आणि खूप सारं प्रेम. हो हो हो! तू माझा मुलगा आहेस, आणि मला तुझी प्रशंसा करण्यापासून कुणीही अडवू शकत नाही.बिग बी यांच्या या पोस्टवर नेटकऱ्यांनी अनेक कमेंट्स केल्या आहेत. खरं तर आपण नेहमीच अभिषेकला ट्रोल करत आलो, पण आता त्यानं दाखवून दिलं की, तो देखील एक चांगला अभिनेता आहे. अमिताभ बच्चन यांच्या या पोस्टवर अशा अनेक प्रतिक्रिया येत आहेत.

# शिवशाही आणि दुचाकीचा भीषण अपघात, मित्राला परिक्षेला सोडायला निघालेल्या तरुणासोबत अनर्थ

**सांगली :** सांगली ते पेठ या राष्ट्रीय महामार्गावरील फळे मंगलकार्यालयाजवळ दुचाकी आणि शिवशाही बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात मित्राला परीक्षा केंद्रावर सोडण्यासाठी सांगलीकडे निघालेल्या तरुणावर काळाचा घाला पडला आहे. त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. तर त्याचा मित्र गंभीर जखमी झाला आहे.वृत्तानुसार, बुधवार सकाळच्या सुमारास हा भीषण अपघात घडला. यामध्ये साहिल अंसारी मुलाणी (वय २२, रा. नागठाणे) या महाविद्यालयीन तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर त्याचा मित्र प्रतिक अनिल साळुंखे (वय १९, रा. बुरूड गल्ली, इस्लामपूर) हा गंभीर जखमी झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी जखमी प्रतिक याला तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.पोलिसांच्या माहितीनुसार, मृत साहिल मुलाणी हा आई व वडिलांसह पलूस तालुक्यातील नागठाणे येथे राहत होता. तो इस्लामपूर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात बी कॉमला शिकत होता. जखमी प्रतिक हा साहिलचा मित्र आहे. दोघेही एकाच महाविद्यालयात शिकत होते. मंगळवारी सकाळी प्रतिक याची स्टेनोची परिक्षा सांगलीतील विल्डिंग्न महाविद्यालयात होती. त्यासाठी साहिल सकाळी नागठाणे येथून दुचाकी घेऊन घरातून बाहेर पडला. त्याने वाळवा येथे दुचाकी पार्क केली आणि बसने इस्लामपूरला आला. प्रतिक याच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नसल्याने साहिलने त्याची मोपेड दुचाकी (एमएच १०, ईडी ४६९९) घेतली. दोघेजण परिक्षेसाठी इस्लामपूरहून सांगलीकडे येत होते.सकाळी सव्वा आठ वाजता दोघेजण दुचाकीवरून सांगलीवाडी टोलनाक्याजवळ आले. याचवेळी बायपास रस्त्यावरून शिवशाही बस (एमएच ०९, ईएम १४७९) सांगलीहून पुण्याकडे निघाली होती. टोलनाक्याच्या पुढे मुख्य चौकात शिवशाही बस रास्ता ओलांडताना दुचाकी आणि बसची समोरासमोर जोराची धडक बसली. बसच्या डाव्या बाजूला धडक बसल्याने दोघेही युवक रस्त्यावर पडले. यात साहिलच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. रस्त्यावर रक्ताचा सडा पडला होता. तो जागीच ठार झाला होता. तर दुचाकीवर पाठीमागे बसलेला मित्र प्रतिक हा जखमी झाला. त्याला तातडीने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. पोलिसांनी पंचनामा करून बसचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शरद पवारांच्या पक्षात मोठ्या हालचाली, रोहित पवारांना मोठी जबाबदारी...


**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात सध्या मोठ्या हालचाली सुरु आहेत. ज्येष्ठ नेते जयंत पाटील हे नुकतेच प्रदेशाध्यक्ष पदावरुन पायउतार झाले आहेत. ज्येष्ठ नेते शशिकांत शिंदे यांना आता प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर लगेच शशिकांत शिंदे यांनी आपल्या कामाला सुरुवात केली आहे. शशिकांत शिंदे यांनी आज पक्षाच्या महत्वाच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. यावेळी त्यांनी काही पदाधिकाऱ्यांना नवीन संधी दिली आहे. शशिकांत शिंदे यांनी प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारताच आमदार रोहित पवार यांना मोठी जबाबदारी दिली आहे. रोहित पवार यांना प्रदेश सरचिटणीस पद देण्यात आलं आहे. तसेच सर्व फ्रंटल आणि सेलच्या प्रभारीपदी रोहित पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शशिकांत शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत याबाबत घोषणा केली. यावेळी त्यांनी रोहित पवार यांना पुष्पगुच्छ देत नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या. माजी आमदार सुनील भुसारा यांनादेखील पक्षाकडून मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. सुनील भुसारा यांना उपाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.आम्ही भविष्य काळामध्ये वाटचाल करण्याच्या संदर्भात नियोजन करणार आहोत. नवीन काही लोकांना जबाबदारी द्याव्या, चळवळीतून हा पक्ष आक्रमक पद्धतीने उभा राहावा म्हणून जनरल सेक्रेटरी म्हणून आमचा युवा नेता रोहित पवार यांची निवड करत आहोत. अधिवासी विभागातील नेतृत्व करणारे आमचे सहकारी सुनील भुसारा यांनासुद्धा उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी देत आहोत. प्राध्यापक असल्या तरी इतर समाजाच्या बांधवांसाठी, शरद पवारांचा विचार प्रखरपणे मांडणाऱ्या कविता नेत्रे यांना राज्याच्या महिला उपाध्यक्षपदाची जबाबदारी देत आहोत, अशी घोषणा शशिकांत शिंदे यांनी केली.या नियुक्त्या झाल्यानंतर जुन्या नियुक्त्यांचं काय? असा प्रश्न पडला असेल तर तो बाजूला करा. पूर्वीची कमिटी सक्षमतेने तशीच राहील. या कमिटीत काही फेरबदल करायचे राहतील तर सर्वांच्या सहमतीने आपण निर्णय घेऊ. नव्या जुन्यांचं मिश्रण करुन एक चांगल्याप्रकारची संघटना उभी करण्याचा प्रयत्न आपण करतोय,



असं शशिकांत शिंदे म्हणाले.यावेळी रोहित पवारांनी देखील प्रदेश सरचिटणीस पदाची जबाबदारी मिळाल्यानंतर आपली पहिली प्रतिक्रिया दिली. मी शरद पवार , खासदार सुप्रिया सुळे, जयंत पाटील, शशिकांत शिंदे आणि सर्व मोठे नेत्यांचे आभार व्यक्त करतो. माझ्या सारख्या कार्यकर्त्यावर आपण मोठी जाबबादीर दिली आहे. आपण ज्याप्रकारे शिव, शाहू, आंबेडकरांच्या विचाराने पुढे चाललात. शरद पवार यांच्या विचाराने पुढे चाललात, तुम्ही विचारांबरोबर आणि शरद पवार यांच्यासोबत राहिलात, तसाच मी सुद्धा असेन. याच्यामुळे आणखी ताकदीने आपण सर्वजण लढुयात अशी ग्वाही देतो. आपण आक्रमक पद्धतीने येत्या काळात काम करुयात. आपल्याला सर्व फ्रंटल सेलला खऱ्या अर्थाने ताकद द्यावी लागले. प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्ता महत्त्वाचा आहे. प्रत्येक कार्यकर्त्याला आणि पदाधिकाऱ्याला प्रदेशाध्यक्ष ताकद देतील. आपण सर्व सोबत लढुयात, अशी भूमिका रोहित पवारांनी यावेळी मांडली.

# श्वेता तिवारीची मुलगी पलकचा क्युट ब्लॅक ड्रेसमध्ये हटके अंदाज, फोटोंनी लावली इंटरनेटवर आग

श्वेता तिवारीप्रमाणेच तिची मुलगी पलक तिवारीही फॅशनच्या बाबतीत कमी नाही. तिची आई वयाच्या ४४ व्या वर्षीही तिच्या ग्लॅमरस लूकने सर्वांपेक्षा वरचढ ठरते, तर लाडलीची स्टाईलही खूपच हटके आहे. कधीकधी ती देसी लूकमध्ये तिचा कल्चरल लूक दाखवते, तर फाटलेल्या स्टायलिश कपड्यांमध्ये तिचा स्टाईल कहर करतो. पलकच्या लेटेस्ट फोटोशूटमधून फोटो समोर आले आहेत. जिथे तिने शॉर्ट ब्लॅक ड्रेस घालून तिचे सौंदर्य दाखवले आहे. या सौंदर्याची स्टाईल इतकी अद्भुत आहे की तिच्यासमोर अनेक स्टार किड्सचा ग्लॅमर फिका पडतो. म्हणूनच पलकचे फोटो समोर येताच चाहतेही तिच्या स्टाईलवर वेडे झाले. २४ वर्षीय पलकने बिजली गर्ल म्हणून इंडस्ट्रीमध्ये प्रवेश केल्यापासून तिची स्टाईल चर्चेत आहे. आता तिने काळ्या रंगाचा चमकदार मिनी ड्रेस घालून तिचे फोटोशूट केले. जिथे तिचे किलर लूक दिसले. त्याच वेळी, व्हॅलेंटिनो लेबल ड्रेस देखील तिच्यावर छान दिसत होता.पलकच्या स्ट्रॅपलेस ड्रेसचा वरचा भाग साधा काळा ठेवण्यात आला होता आणि त्याला बॉडी फिटिंग डिझाइन देण्यात आले होते. जे तिच्या फिगरला सुंदरपणे पूरक होते, यावेळी पलकने तिचे टोन्ड पाय दाखवले आणि ग्लॅमरमध्ये भर घातली. त्याच वेळी, कंबरेवर गुलाबी, बेज आणि पांढऱ्या रंगाच्या कापडापासून बनवलेल्या फुलानेही लूकचे सौंदर्य वाढवले. पलकच्या स्कर्टला काळ्या जाळीच्या फॅब्रिकने पफी लूक



देण्यात आला होता आणि त्यावर फ्लेअर्स घालण्यात आले होते. त्यामुळे बॉडी फिटेड टॉपसह हा एम्बॉस्ड पॅटर्न छान दिसत होता. त्यावर असलेल्या काळ्या सिक्विन स्टार्सने केवळ स्कर्टमध्येच नाही तर पलकच्या संपूर्ण लूकमध्ये चमक आणली. जिथे नेहमीप्रमाणे, पलकचा सिझलिंग लूक इतरांना मागे टाकताना दिसला.पलकच्या लूकला स्टायलिंग करताना तिने मिस जो आणि हाऊस ऑफ शँडेलचे दागिने घातले होते. तिचे कानातले असोत किंवा तिच्या हातावर घातलेल्या वेगवेगळ्या स्टाईलच्या चांदीच्या ब्रेसलेट असोत, सर्वकाही लूकसोबत जुळले. त्याच वेळी, लेबलच्या तिच्या पीच शेडच्या हाय हिल्स देखील खूपच आकर्षक दिसत होत्या.ॲक्सेसरीजनंतर, पलकने केस आणि मेकअपमध्ये काहीही अतिरिक्त केले नाही आणि केसांना बाजूने विभाजित करून वेव्ही टच दिला. त्याच वेळी, चमकदार न्यूड ओठ, लाल गाल आणि डोळे सुंदर दिसत होते. पलकची स्टायलिश स्टाईल पाहून चाहत्यांनीही तिच्या लूकचे कौतुक करणे थांबवले नाही.

# एसटीत काय चाललंय, हे मलाही कळत नाही! परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांची उद्विग्नता...



**मुंबई :** अधिकाऱ्यांची चौकशी होऊन आरोप निश्चित झाले तरी ते त्याच जागी कायम राहतात. एसटी महामंडळात गेल्या काही वर्षांपासून काय चालले आहे, हे मलाही कळत नाही,फ असे उद्विग्न उद्गार काढले आहेत दस्तुरखुद्द परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी. आमदार अनिल परब यांनी पुण्यातील दापोडी आणि छत्रपती संभाजीनगरमधील चिकलठाणा मध्यवर्ती भांडार खरेदीत झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्यासंदर्भात विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला. अधिकाऱ्यांविरोधात तक्रारींबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी सुरू केली आहे का, असे आमदार परब यांनी विचारले. त्यावर उत्तर देताना परिवहन मंत्री सरनाईक यांनी परब यांना उद्देशून , ङ्गतुम्हीही या खात्याचे मंत्री होतात, तुम्हालाही पटेल की या एसटी महामंडळात नेमके काय सुरू आहे तेच कळत नाही .अधिकाऱ्यांची चौकशी होऊन आरोप निश्चित झाले तरीही ते त्याच जागी कायम राहतात,फ असे सांगून सरनाईक यांनी एका अधिकाऱ्यावर नोंदविण्यात आलेल्या आक्षेपांची जंत्रीच वाचून दाखवली. यावर सभापती राम शिंदे यांनी, कारवाई काय करणार हे सांगा, अशी सूचना केली. आमदारांनीही कारवाईची मागणी केली.गंभीर गैरव्यवहारांप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर अनेक आरोप असल्याने त्यांना बडतर्फ करण्यात येईल, अशी घोषणा परिवहनमंत्र्यांनी केली. तथापि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हस्तक्षेप करून, संबंधित अधिकाऱ्यांना केवळ निलंबित करून भागणार नाही, तर स्पष्ट कायदेशीर नोटीस देऊन, त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन नंतर ङ्गस्पीकिंग ऑर्डरफ देऊन बडतर्फ केले जावे. त्यावर परिवहन मंत्री यांनी ङ्गस्पीकिंग ऑर्डरफ देऊन अधिकाऱ्याला बडतर्फ केले जाईल, असे सांगितले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रभाग रचनेचा प्रारूप मसुदा प्रसिद्ध हरकती २१ जुलैपूर्वी पाठविण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रभागाच्या भौगोलिक सीमा निश्चित करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार निर्वाचक गण रचनेचे प्रारूप प्रसिद्ध करण्यात आले असून तसा आदेश जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे. बुलढाणा जिल्हा परिषद निवडणुक विभाग व १३ पंचायत समिती निर्वाचक गणाची प्रारुप प्रभागरचना दि. १४ जुलै २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून संबंधीत तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, जिल्हा परिषद पंचायत समिती कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात पहावयास उपलब्ध आहे. मसुद्याबाबत आक्षेप व हरकती असल्यास जिल्हाधिकारी कार्यालय किंवा संबंधित तहसीलदार यांच्याकडे दि.२१ जुलैपूर्वी लेखी सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बुलढाणा जिल्हा परिषदेची ६१ निवडणुक विभाग निश्चित करण्यात आले असून तालुकानिहाय निवडणूक विभाग प्रारूपानुसार पुढील प्रमाणे. जळगांव जामोद तालुक्यात जामोद, खेर्डा बु., आसलगाव, पिंपळगाव काळे असे ४ निवडणूक विभाग आहेत. संग्रामपूर तालुक्यात सोनाळा, बावणबीर, पळशी झाशी, पातुर्डा बु. असे ४ निवडणूक विभाग. शेगांव तालुक्यात माटरगांव बु,जलंब असे २ निवडणूक विभाग. नांदूरा तालुक्यात निमगांव, वसाडी बु., चांदूरबिस्वा, वडनेर भोलजी असे ४ निवडणूक विभाग. मलकापूर तालुक्यात नरवेल, मकापूर ग्रामीण,दाताळा असे ३ निवडणूक विभाग. मोताळा तालुक्यात पिंप्रीगवळी, कोथळी, धामणगाव बढे, रोहिणखेड, बोराखेडी असे ५ निवडणूक विभाग. खामगांव तालुक्यात सुटाळा बु., घाटपुरी, अटाळी, अंत्रज, पिंपळगाव राजा, कुंबेफळ, लाखनवाडा बु. असे ७ निवडणूक विभाग.मेहकर तालुक्यात देऊळगांव साकर्शा, डोणगाव, अंजनी बु., जानेफळ, कळंबेश्वर, देऊळगाव माळी, उकळी असे एकूण ७ निवडणूक विभाग. चिखली तालुक्यात उदयनगर, अमडापुर, इसोली, सवणा, केळवद, मेरा खु., मेरा बु. असे एकूण ७ निवडणूक विभाग. बुलढाणा तालुक्यात देऊळगाव, सुंदरखेड, साखळी बु., मासरुळ, धाड, रायपूर असे एकूण ६ निवडणूक विभाग. देऊळगांव राजा तालुक्यात देऊळगांव मही, सिनगांव जहाँगीर, सावखेड भोई असे एकूण ३ निवडणूक विभाग. सिंदखेड राजा तालुक्यात साखरखेर्डा, शेंदुर्जन, किनगाव राजा, दुसरबीड, वर्दडी बु. असे ५ निवडणूक विभाग. लोणार तालुक्यात सुलतानपूर, वेणी, बिबी, पांग्रा डोळे असे ४ निवडणूक विभाग आहे.

# ज्येष्ठ नागरिकांसाठीची राष्ट्रीय हेल्पलाईन एल्डर लाईन १४५६७ हि टोल फ्री हेल्पलाईन

**जनसंचलन/बुलडाणा**

सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालय, भारत सरकार, मार्फत देशभरातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या निवारणासाठी, सर्व राज्यांत ङ्कएल्डर लाईन १४५६७फ्र हि टोल फ्री हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय समाज रक्षा संस्थान (), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि जनसेवा फाँऊडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यामध्ये ज्येष्ठांसाठीची ही राष्ट्रीय हेल्पलाईन जनसेवा फाँऊडेशन द्वारे चालवली जात आहे. या राष्ट्रीय हेल्पलाइनचा उद्देश हा भारतातील ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक विश्वासार्ह राष्ट्रीय हेल्पलाइन तयार करून ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणे तसेच अत्याचार ग्रस्त वृद्ध व्यक्तींची काळजी घेणे हा आहे. जेष्ठांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी निसंकोचपणे ङ्कएल्डर लाईन १४५६७फ्र या टोल फ्री हेल्पलाईन यावर संपर्क साधावा आणि या संकेत स्थळावर भेट द्यावी, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# आधिपरिचारिका लिंग आधारित नियम तात्काळ रद्द करा - क्रांतिकारी शेतकरी संघटना



**जनसंचलन/ जानेफळ**

आधिपरिचारिका लिंग आधारित नियम आता नव्याने लागू करण्यात आला आहे. हा नियम सरळ सेवा भरतीतील आधिपरिचारिका सेवा प्रवेश व्यवसायात लिंग भेदभाव निर्माण करतो. नर्सिंग व्यवसायत स्त्रिया पुरुषांचे ८०:२० प्रमाण बंधनकारक केल्यामुळे, पात्र पुरुष उमेदवारांची संख्यात्मक संधी कमी होते. त्यामुळे हा नियम पुरुष उमेदवारांसाठी अन्यायकारक आहे. हा नियम तातडीने रद्द करावा अशी मागणी, क्रांतिकारी शेतकरी संघटना आणि मेल नर्से स बचाव समितीच्या वतीने करण्यात आली असून या संदर्भात १४ जुलै २०२ ५ रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. क्रांतिकारी शेतकरी संघटना आणि मेल नर्से स बचाव समितीच्या वतीने या निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले की ११ जून २०२५ रोजी डीएमईआर द्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या अधिपरिचारिका सेवा प्रवेश नियम २०२५ मध्ये ८०:२० लिंग विभाजक नियम लागू करण्यात आला आहे.हा नियम पुरुष परिचारिकावर स्पष्ट अन्याय करतो व नर्सिंग व्यवसायात स्त्रिया पुरुष यांचे प्रमाण बंधनकारक असल्यामुळे पात्र पुरुष उमेदवारांची संख्यात्मक संधी कमी होते. हा नियम भारतीय राज्य घटनेतील अनुछेद १४,१५(०१) आणि १६(०१) च्या विरोधात आहे. पुरुष उमेदवारावर हा नियम म्हणजे एक प्रकारचा अन्यायच आहे, त्यामुळे ८०:२० लिंग विभाजक नियम तात्काळ रद्द करण्यात यावा आणि पूर्वीच्या नियमाप्रमाणेच शासन निर्णय ठेवण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. महिन्याभरात नवीन शासन निर्णय रद्द केला नाही तर क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वामध्ये, मेल नर्से स बचाव समितीला सोबत घेऊन मुंबई येथे मंत्रालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देखील देण्यात आला आहे.

# लम्पी आजाराच्या व्यवस्थापनाकरिता वेळीच करा उपाययोजना; कृषि विज्ञान केंद्राचे आवाहन...

**जनसंचलन/बुलढाणा**

जनावरांमध्ये झपाट्याने फैलावत असलेल्या लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव लक्षात घेता पशुपालकांनी वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणामार्फत जिल्ह्यातील विविध गावांमध्ये जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून, पशुपालकांना शिफारशीत उपाययोजना करून या विषाणूजन्य रोगापासून जनावरांचे संरक्षण करण्याचे आवाहन कृषि विज्ञान केंद्राकडून करण्यात येत आहे. रोगाचे कारण व प्रसार: लम्पी स्किन डिसीज ( ) हा एक विषाणूजन्य चर्मरोग असून, तो कॅप्रीपॉक्स व्हायरसमुळे होतो. रोगाचा प्रसार प्रामुख्याने चावणाऱ्या माश्या, डास, गोचीड, चिलटे यांच्या माध्यमातून, बाधित व निरोगी जनावरांच्या संपर्कातून, नाक-डोळ्यातील स्त्राव, तोंडातील लाळ चाऱ्यावर व पाण्यावर लागल्यास संसर्ग होतो. या रोगाचा सर्व वयोगटातील जनावरांवर परिणाम होतो, मात्र लहान वासरे अधिक प्रभावित होतात. उष्ण आणि दमट हवामानात कीटकांची वाढ अधिक असल्याने पावसाळ्यात प्रादुर्भाव वाढतो. लक्षणे : ताप येणे व दुध उत्पादनात घट, डोळ्यातून पाणी येणे, लसिका ग्रंथीना सूज, त्वचेवर गाठी (१०-५० मिमी व्यासाच्या), मुख्यतः डोके, मान, पायावर, फुफ्फुसदाह, कासदाह, गर्भपात व प्रजनन क्षमतेत घट, पांढऱ्या रक्तपेशींची संख्या कमी होणे या रोगाचे लक्षणे आहे. उपचार व घरगुती उपाय : प्रतिजैविके, ज्वरनाशक, जीवनसत्त्वे ( व ) व शक्तिवर्धक औषधांचा वापर, त्वचेवरील व्रणांवर फ्लाय रिपेलंट स्प्रे, तोंडातील व्रणासाठी २% पोटॅशियम परम्यांगनेट द्रावण व बोरोग्लीश्रीन. घरगुती उपाय: १० खायची पाने, १० ग्रॅम मीरे, १० ग्रॅम मीठ यांची पेस्ट करून त्यात गूळ मिसळून जनावरांना द्यावी, पहिल्या दिवशी दर ३ तासांनी,



दुसऱ्या दिवशीपासून दिवसातून ३ वेळा १५ दिवसपर्यंत, जखमांमध्ये किडे पडल्यास खोबरेल तेलात कापूर, सीताफळाच्या पानांचा लेप लावावा. रोगनियंत्रण व प्रतिबंधात्मक उपाय : बाधित व निरोगी जनावरांना वेगळे ठेवावे, एकत्रित चारा-पाणी देऊ नये, गोठ्याचे नियमित फवारणीद्वारे निर्जंतुकीकरण(०.०१% डेल्टामेथ्रीन), पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली लसीकरण करावे, गोठा स्वच्छ ठेवणे, माशा व डास यांचे नियंत्रण करणे अत्यावश्यक आहे. या आजारावर उपाय करण्यापेक्षा प्रतिबंध करणे महत्त्वाचे असून, पशुपालकांनी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा आणि नियमित सल्ला घ्यावा. जनावरांचे नुकसान टाळण्यासाठी वेळीच लसीकरण करून घ्या, असे आवाहन कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा यांनी केले आहे.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
सिटी बुलडाणा
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# एकता नगरमध्ये मोकाट डुकरांचा हैदोस;महिलांनी दिली नगर परिषदेला लेखी मागणी...

जनसंचलन/बुलढाणा



शहरातील एकता नगर परिसरात मोकाट डुकरांचा त्रास दिवसेंदिवस वाढत असून, या समस्येने त्रस्त झालेल्या महिला रहिवाशांनी नगर परिषदेला लेखी निवेदन सादर करून तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. महिलांनी दिलेल्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे, सदर डुक्कर हे अंगणात व घरात घुसून लहान मुलांवर हल्ला करण्याचा प्रयत्न करीत आहेत. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वीही पालिकेला तक्रार करूनही योग्य कारवाई झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदन आरती कळमकर, दिपमाला पवार, दिपमाला गौतम दामोदर निशा डोंगरे. यांच्यासह इतर महिलांचा समावेश होता. या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष देऊन मोकाट डुकरांचा बंदोबस्त करण्यात यावा, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. अन्यथा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, असा इशाराही अर्जात देण्यात आला आहे.

# शिवसेना सह संपर्कप्रमुखांची जबाबदारी प्रा. लहाने यांच्याकडे

जनसंचलन/ बुलढाणा



जिल्हा परिषद ,पंचायत समित्या निवडणुका पुढ्यात आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेने जिल्ह्यात महत्त्वाचे फेरबदल केले आहे. काही व्यक्तींवर महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या निर्धारित केल्या असून त्यामध्ये सामाजिक क्षेत्रात भरिव कार्य करणारे प्रा. डी एस लहाने यांच्याकडे सह संपर्कप्रमुख पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. प्रा.डी एस लहाने यांनी जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात देखील मानस फाउंडेशनच्या माध्यमातून विधवा महिलांसाठी मोठे सामाजिक कार्य हाती घेतले आहे. सहकारातही त्यांची आघाडी आहे. शिक्षण क्षेत्रातही त्यांनी शिवसाई ज्ञानपीठ च्या माध्यमातून नाव कमावले आहे. जिल्हा परिषद सदस्य राहून त्यांनी पूर्वीच आपला परिचय देखील दिला आहे.शिवसेनेत त्यांनी पक्ष संघटन बांधणीकडे विशेष लक्ष दिले. नुकताच बुलढाणा विधानसभेतील शंभर कार्यकर्त्यांचा त्यांनी मातोश्री वर पक्षामध्ये प्रवेश करून घेतला. ८० टक्के समाजकारण २०% राजकारण या शिवसेनेच्या व्याख्यात प्रा. लहाने तंतोतंत बसतात. या कार्याची दखल घेत पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने सह संपर्कप्रमुख पदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे ,शिवसेना नेते विनायक राऊत, संपर्क प्रमुख नरूभाऊ खेडेकर ,जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत ,राज्य प्रवक्त्या जयश्रीताई शेळके, आमदार सिद्धार्थ खरात व अन्य सहकारी मित्रांचे आभार मानले

# निवडणुका न घेता प्रशासकीय अधिकाऱ्यांनाच जनसेवक ही पदवी बहाल करा!

## जनसामान्य माणूस अन्याय अत्याचार कृती समितीची मागणी!

जनसंचलन/बुलढाणा



नगर परिषदेमध्ये चार ते पावणे पाच वर्षापासून निवडणूक झालेली नसताना आणि एकही सदस्य किंवा पदाधिकारी कार्यरत नसताना, प्रशासकीय अधिकारी नागरिकांची कामे चांगली करत असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कायमस्वरूपी प्रशासकीय अधिकारी ठेवावे व सदस्य हे पद रद्द करण्यात यावे, अशी मागणी जनसामान्य माणूस अन्याय अत्याचार कृती समितीने जिल्हाधिकारी यांना केली आहे. बुलढाणा शहरात गेल्या चार ते पावणे पाच वर्षापासून नगर परिषदेच्या निवडणुका झालेल्या नाहीत. त्यामुळे सदस्य किंवा पदाधिकारी कार्यरत नाहीत.नगर परिषदेचे कार्य हे प्रशासकीय अधिकारीच पार पाडत आहेत. जनतेची कामे देखील चांगल्या रीतीने पार पाडली जात असून, कोणत्याही घटकाला मूलभूत गरजांपासून वंचित ठेवल्या जात नाही.त्यामुळे कोणताही सदस्य नसताना एवढी चांगली कामे होत असेल तर सदस्य कशाला हवेत? असा प्रश्न निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे. नगरपरिषदेत कोणतेही नागरिकाची समस्या किंवा तक्रार आली तर अवघ्या पाच मिनिटात समस्यांचे निराकरण होते. तर कशाला सदस्य पाहिजे ? त्यामुळे निवडणुका न घेता प्रशासकीय अधिकाऱ्यांनाच जनसेवक ही पदवी बहाल करावी आणि निवडणुकीवर होणारा हजारो कोटींचा खर्च शासनाने वाचवावा,अशी मागणी जनसामान्य माणूस अन्याय अत्याचार कृती समिती बुलढाणाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून आज १५ जुलै रोजी केली आहे.

# कार व रोहीच्या धडकेत रोही ठार!



जनसंचलन/ जानेफळ

खाद्यान्नाच्या शोधार्थ वन्य प्राणी जंगलाबाहेर पडत असून, मानवप्राणी संघर्ष अलीकडे दिसून येते.जानेफळ पासून चार ते पाच किलोमीटर अंतरावर मोसम्बेवाडी जवळील समृद्धी महामार्गावर आज १६ जुलै रोजी कार व रोहीची जोरदार धडक होऊन रोही अर्थात नीलगाय ठार झाली आहे. या अपघातात कार मधील दोन पुरुष व दोन महिला आणि एक मुलगी सुखरूप आहे. पाणी व खाद्यान्नाच्या शोधात वन्य प्राणी मनुष्यवस्तीकडे वळत आहेत. स्व. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर अनेकदा मोकाट जनावरे आढळून येतात. ही मोकाट जनावरे काहींसाठी काळ ठरतात. आजही एक रोही एका कारच्या अचानक आडवे आल्याने अपघात झाला. सदर कार मधील प्रवासी अमडापूर येथील असून ते जानेफळवरून समृद्धी मार्गावर मुंबई जाण्यासाठी चालले होते. मात्र रोही या प्राण्याची जोरदार धडक झाली. या अपघातात रोही दगावली आहे तर कार मधील दोन पुरुष व दोन महिला आणि एक मुलगी बचावले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८